## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र. ३४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १८/०१/२०१८

**१) अवैद्यरित्या बिनापास परवाना रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १७/०१/२०१८ चे ०८.०० वाजता. दरम्यान यातील आरोपी चालक व मालकांनी त्याचे ताब्यातील नंबर नसलेल्या ट्रॅक्टर ट्रॉलीसह ब्रास रेती किंमती २,०००/—रु. ची बिनापास परवाना चोरीची रेती भरुन अवैद्यरित्या मिळुन आल्याने फिर्यादी अरविंद रमेश रेवतकर वय ४४ वर्ष,रा. तहसिल कार्यालय मोहाडी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३७९,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. केवट पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**२) शेळयांची चोरी . :—**

दिनांक १६/०१/२०१८ चे २२.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी गौतम दुर्गाप्रसाद घरडे वय ३१ वर्ष, रा. नवेगाव यांचे घराशेजारील छपरात ३ काळया रंगाचे गावठी बोकड, ७ काळया खैऱ्या लालसर, २ लालसर, ३ पांढऱ्या अश्या एकुण १२ शेळया, २ काळे पांढरे छोटे शेळीचे पिल्लु असा एकुण ४९,०००/—रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिन्हेपुंजे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) मोटार सायकलच्या धडकेत एक जखमी . :—**

दिनांक १६/०१/२०१७ चे २०.१५ वाजता. दरम्यान यातील फिर्यादी सचिन रमेश टिकरीया वय ३६ वर्ष रा. विद्या नगर भंडारा याने आपली दुकान बंद करुन सायकलने घरी परत येत असता यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचे सायकलला तुळशिनगर खात रोड भंडारा येथे धडक मारुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३८ भादंवि. सहकलम १३४,१८७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोगे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) संगनमत करुन तरुणीला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १३/०१/२०१८ चे १८.०० ते १७/०१/२०१८ चे १५.०० वाजता. पर्यत यातील आरोपीतांनी संगनमत करुन यातील मृतक तरुणी सोबत भांडण करुन तिला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. चेके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**५) लग्नाचे आमिष दाखवुन अत्याचार केल्याने गुन्हा नोंद . :—**

ऑगस्ट २०१७ ते आज पर्यत. यातील फिर्यादीला यातील आरोपी याने लग्नाचे आमिष दाखवुन फिर्यादी वर शारीरीक अत्याचार केला व लग्न करण्यास नकार दिला असुन फिर्यादी ही ५ महीण्याची गर्भवती असल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३७६(२)(ह)(म),४१७ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. किचक पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

६) **लाचलुचपत प्रतिबंधक यांची कारवाई . :–**

दिनांक ०५/०१/२०१८ चे १२.०८ ते १३.१४ वाजता. दरम्यान यातील आरोपी यांनी तक्रारदार यांना पडताळणी कारवाही वेळी त्याचे पंतप्रधान आवास योजने अंतर्गत मंजुर घरकुल योजनेचे बांध कामपुर्ण केल्याने अंतीम टप्यातील चेक मिळण्याकरीता घरकुलाचे प्रमाणपत्रावर व रोजगार हमीच्या मस्टरवर स्वाक्षरी करण्याकरीता २,५००/–रु. लाचेची मागणी करुन तळजोडी अंती २,०००/–रु. लाचेची स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने सरतर्फे फिर्यादी पोनी. पारधी एसीबी भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ७ ला.प्र.का १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. पारधी पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

७) **अवैध दारु अड्डयांवर धाडी . :–**

दिनांक १७/०१/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन कारधा, तुमसर, व पवनी येथे अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण १३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४९ लिटर हातभट्टी दारू किंमती ४,८००/–रु, ५२२ लिटर देशी दारु+ १ टाटा चिनॉज फोर व्हिलर किंमती ६५०८००/–रु. असा एकुण किंमती ६५,५६००/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

पोनी. (एस.आर. तेलुरे)
जिविशा शाखा
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९२१२५३५४९

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.

## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
## (दुपार)

जा.क्र. ३५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १८/०१/२०१८

**१) भांडण व शिवीगाळ करुन चावा घेवुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १७/०१/२०१८ चे ०८.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी विक्रांत खुशाल रामटेके वय २६ वर्ष, रा. पुयार हा आपले भावासोबत त्याचे जागे मध्ये गायी धुत असतांना पाणी रोडावर गेल्याने यातील आरोपीतांनी संगनमत करुन येथे चिखल होते, म्हणुन फिर्यादी सोबत भांडण करीत असता फिर्यादीचे वडीलांनी भांडण कशाला करता असे हटकले! असता आरोपीतांनी शिवीगाळ, भांडण करुन आरोपी क्र. १ व २ यांनी फिर्यादी व त्याचे १ व २ यांनी फिर्यादी व त्याचे हाताला चावा घेवुन जखमी केल्याने व जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३२४,५०४,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खंडाते पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**२) अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारपीट केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १६/०१/२०१८ चे १३.३०.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी हा घटना तारखेला शेता कडुन घराकडे येत असतांना यातील आरोपीतांनी शेतीचे वादा वरुन फिर्यादीस अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन लाथा बुक्यांनी मारपीट करुन मारण्या पीब्टण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम २९४,३२३,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. लिल्हारे पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**३) जळाल्याने औषधोपचारा दरम्यान महिलेचा मृत्यु . :–**

दिनांक १५/०१/२०१८ चे ११.०० वाजता. दरम्यान यातील मृतक सौ. शामकला लोकेश लक्षणे वय ३३ वर्ष, रा. गुरडा ही जळाल्याने तीला औषधोपचारा करीता सा. रु भंडारा येथे नेले असता तेथील डॉ. ने तपासुन मृत घोषीत केल्याने डॉ. मेमो वरुन पो. स्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. गंथाडे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कोल्हे पो.स्टे पालांदुर हे करीत आहेत.

**४) वैनगंगा नदीचे पात्रात उडी घेवुन इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक १७/०१/२०१८ चे १३.०० वाजता. दरम्यान यातील मृतक भाऊराव शंकर साखरकर वय ५८ वर्ष, रा. नाशिक नगर भंडारा हा दारु पिण्याच्या सवईचा असुन त्याचे हातापायाला सुजन आल्याने चालण्यास त्रास होत होते. त्यामुळे मृतकने त्रासाला कंटाळुन वैनगंगा नदीचे पात्रात उडी घेवुन मरण पावल्याने फिर्यादी सचिन भाऊराव साखरकर वय ३० वर्ष, रा. नाशिक नगर दुरदर्शन टॉवर जवळ भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साकुरे पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**५) आमरोड वर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १७/०१/२०१८ चे १६.०० ते १६.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने बोलरो पिकअप गाडी ही एन एच ६ रोडवर ऊभी ठेवुन येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोंकाचे जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करुन मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोहवा. रामटेके यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. रामटेके पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक १७/०१/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ८९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी — ०२ तीन सिटर वाहनांवरती— १० केसेस व ईतर वाहनांवरती —७७ केसेस करण्यात आले आहे.

पोनी. (एस.आर. तेलुरे)
जिविशा शाखा
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९२१२५३५४९

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.